## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. राकेश रामटेके यांना क्वीक हिल फाऊंडेशन यांनी बेस्ट प्रिंसीपल या ॲवार्डने सन्मानित केले आहे.

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा राष्ट्रीय ॲवार्ड–२०२६ चे आयोजन क्वीक हिल फाऊंडेशन, पुणे येथे केले होते. यामध्ये भारतातील ३६ मविद्यालय व २ विद्यापीठ यांचे नामांकन करण्यात आले होते. या कार्यक्रमातप्रा. रामटेके यांना ॲवार्ड देण्यात आला. यावेळी क्वीक हिल फाऊंडेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनुपमा काटकर व सायबर सेलचे पोलिस अधिक्षक संजय शिंत्रे आदी उपस्थित होते.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २ (प्रतिनिधी) : बँक ऑफ महाराष्ट्र जळगाव शाखेकडून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठास विद्यार्थ्यांकरीता चार वॉटर कुलर भेट देण्यात आले.

बँक ऑफ महाराष्ट्र यांनी साजिक उत्तर दायित्व निधीतून ६०लिटर क्षमतेचे ४ वॉटर कुलर विद्यार्थ्यांकरीता दिले. यावेळी कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, बँक ऑफ महाराष्ट्राचे झोनल मॅनेजर प्रवीण सिंग, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, बांभोरी शाखेचे व्यवस्थापक अभिनव आर्या, नीरज शर्मा व उपवित्त अधिकारी सोमनाथ गोहील उपस्थित होते.

...........................................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २ एप्रिल, २०२६

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता